डिसेंबर २००३

# पतसंस्थांचा ''मॉडेल बायलॉज''

महाराष्ट्र राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी राज्यातील सहकारी पतसंस्थांचा नवीन उपविधी परस्पर ''मॉडेल बायलॉज'' नावाने जाहीर करुन, तो पतसंस्थानी त्वरीत स्विकारणेसाठी आदेश काढले.एवढे नव्हे तर सक्तीने हे बंधनकारक केले जातील असेही आदेश काढले.राज्यातील जिल्हा – तालुका – विभाग स्तरातील पतसंस्थासाठी गेली अनेक दशके काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी जिल्हा – महासंघानी ह्या कृतीस, महाराष्ट्र राज्य सहकारी संघासहीत सर्वांनी विरोध केला. सहकार कायदा पायदाळी तुडवून,नवीन उपविधीत,चळवळ डळमळीत व भयभीत करणाऱ्या गोष्टी अंतुर्भूत केल्या होत्या. अखेर हा उपविधी स्विकारण्याची तारीख वाढवावी लागली.अन्यायकारक व बेकायदेशीर गोष्टी त्यातून काढव्या लागल्या. परंतु लगेच दुसरे बंधन टाकले गेले. तो नवीनउपविधी ठराविक लोकांना छापण्याचे व विकण्याचे अधिकार दिले. जे पुर्णतः सहकार चळवळीला वेठीस धरणारी व मुलभूत हक्कांची पिळवणूक करणारी कृती लादण्याचा आदेश संबंधितांनी काढला. त्यालाही राज्यात जबरदस्त विरोध झाला. पतसंस्थांनी नवीन उपविधी झेरॉक्स करुन घेतले. उपविधी मान्यतेसाठी उपनिबंधक /जिल्हा उपनिबंधक / विभागीय सहनिबंधक / सहकार आयुक्त ह्यांचेकडे पाठविले. काही अधिकाऱ्यांनी दोन महिने मंजुरीसाठी तपासणी नावाखाली वेळ काढला. काहींना नामंजुरी दिली. व पुन्हा सहकार चळवळीस प्रती आव्हान दिले.

म्हणून ह्याकारणास्तव राज्यातील ज्या पतसंस्थांनी संबंधीत नोंदणी अधिकाऱ्यांकडे नवीन उपविधी मंजुरीसाठी प्रकरणे सादर केली व अद्याप कुठल्याही कारणास्तव मंजूरी दिली नाही किवा प्रकरण नामंजूर केले. त्यांनी त्वरीत आमच्याशी थेट पत्रव्यवहार करुन संपर्क साधावा. न्याय मिळविणेसाठी पुन्हा सर्व स्तरावर बाजू मांडणार व आवाज उठविणार.

म्हणून संबंधीत पतसंस्थांनी आदेश देणाऱ्यांचे व परिपत्रके काढणाऱ्यांचे अधिकार सहकार कायद्याप्रमाणे तपासून पहावेत. सर्व प्रश्नांची सोडवणूक कायदाच करु शकतो. जबरदस्तीचे आदेश /परिपत्रके हा कायदा होऊ शकत नाही. कारण पतसंस्थांमधील ठेवी, भांगाची रक्कम १०० टक्के सुरक्षित,फायद्याची व कायदेशीर ठेवण्याची जबाबदारी संचालक मंडळाचीच आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**